REGISTERED No. B. 3434





# अर्थ


" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ | पुणें, बुधवार तारीख १२ मार्च १९४७ | अंक ११





## म्युनिसिपालिटीच्या

दिव्याखालीं अभ्यास करून पास होणारे निःसंशय थोर होत ! पण अशी पाळी आपल्यापैकी कोणावरहि येऊं नये असें प्रत्येकास वाटतें.

**यावर विमा उतरणें हा एकच उपाय**

★

प्रमुख सल्लागार

श्री. वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., प्रेसिडेंट, कौन्सिल ऑफ डायरेक्टर्स, वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कं. लि., सातारा.

★

चेअरमन

श्री. डी. डी. देशपांडे, बी. ए., मॅनेजिंग डायरेक्टर, न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि., मुंबई.

●

★ पहिल्याच मूल्यमापनांत नफा झाला आहे.

★ डॉक्टरी तपासणीशिवाय रु. ९०० पर्यंतचे विमे घेतां येतात.


★ लायसेन्सशिवाय एजन्सी घेतां येते.

—ठिकठिकाणीं ऑर्गनायझर्स व एजंटस नेमणें आहेत—

अधिक माहितीसाठी भेटा अगर लिहा:— श्री. शि. न. कोल्हटकर, बी. ए. मॅनेजिंग डायरेक्टर

**—युवर ओन प्रॉव्हिडंट इन्शुअरन्स कं. लि.,—**

वेस्टर्न इंडिया हाऊस, सर फेरोजशहा मेथा रोड, फोर्ट, मुंबई १.




पुणें चीफ एजंट:—

न्यू दत्त एजन्सी,

१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें

# आरको

प्रत्येकास लागणारी नित्योपयोगी वस्तू

आरको निलगिरी तेल

लक्ष्मी एजन्सी, मुंबई २४

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

—सर्व प्रांतांतील—

सुती – गरम – रेशमी

—खादीचा उत्तम संच—

# खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

श्री — श्री — श्री — श्री — श्री

श्री

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

युद्धोत्तर कालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण
वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के
डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

लोकांच्या विश्वासास पात्र झालेलें

## दी डेक्कन इंजिनिअरिंग, लिमिटेड.

माधवनगर ( बुधगांव ) एम्. एस्. एम्. रेल्वे

—यांचे—

| नांगर | चरक |
|---|---|
| किसान नं. १०१ ( सहा ते आठ बैली ) | विश्वास ( चार बैली ) |
| किसान नं. १०२ ( चार ते सहा बैली ) | वासुदेव ( दोन बैली ) |
| किसान नं. १०५ ( दोन ते चार बैली ) | राजा ( एक बैली ) |

'मधुकर' ( सात फण्याचे ) कोळपें ( दोन बैली )

एजंटस्, स्टॉकिस्टस् नेमणें आहेत

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३, शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.


REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख १२ मार्च १९४७ अंक ११



## म्युनिसिपालिटीच्या

दिव्याखालीं अभ्यास करून पास होणारे निःसंशय थोर होत ! पण अशी पाळी आपल्यापैकी कोणावर-हि येऊं नये असें प्रत्येकास वाटतें.

**यावर विमा उतरणें हा एकच उपाय**

★

प्रमुख सल्लागार

श्री. वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., प्रेसिडेंट, कौन्सिल ऑफ डायरेक्टर्स, वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कं. लि., सातारा.

★

चेअरमन

श्री. डी. डी. देशपांडे, बी. ए., मॅनेजिंग डायरेक्टर, न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि., मुंबई.

●

★ पहिल्याच मूल्यमापनांत नफा झाला आहे.

★ डॉक्टरी तपासणीशिवाय रु. ९०० पर्यंतचे विमे घेतां येतात.


★ लायसेन्सशिवाय एजन्सी घेतां येते.

—ठिकठिकाणीं ऑर्गनायझर्स व एजंटस नेमणें आहेत.—

अधिक माहितीसाठी भेटा अगर लिहा:— श्री. शि. न. कोल्हटकर, बी. ए. मॅनेजिंग डायरेक्टर

**—युवर ओन प्रॉव्हिडंट इन्शुअरन्स कं. लि.,—**

वेस्टर्न इंडिया हाऊस, सर फेरोजशहा मेथा रोड, फोर्ट, मुंबई १.




पुणें चीफ एजंट:—

न्यू दत्त एजन्सी,

१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें

# आरको

प्रत्येकास लागणारी नित्योपयोगी वस्तु

आरको निलगिरी तेल

लक्ष्मी एजन्सी, मुंबई २४

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

-सर्व प्रांतांतील-

सुती – गरम – रेशमी

—खादीचा उत्तम संच—

# खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

## विविध माहिती

**ॲडआर्ट्स लि., मुंबई—** ३ मार्च, १९४७ अखेर संपलेल्या आठवड्यांत ६ कंपन्यांना २ कोटि, ९२ लक्ष रुपयांच्या भांडवल उभारणीस हिंदुस्थान सरकारनें परवानगी दिली. त्यांत ॲडआर्टस लि. मुंबई ही जाहिरात धंद्याची प्रायव्हेट कंपनी आहे. तिला १० लक्ष रुपयांचें भांडवल उभारून पब्लिक कंपनींत रूपांतर करण्यास परवानगी मिळाली आहे.

**पेटंटचे बाबतींत आपला मागसलेपणा—**युद्धापूर्वी अमेरिकेंत दरसाल सरासरीनें ४८,६९७ पेटंटस दिलीं जात. जर्मनींत त्यांची संख्या २०, ६२१ असे. ग्रेट ब्रिटनमध्यें १८,४१७ व जपानमध्यें ४, ८४५ पेटंटस् सरासरीनें दिलीं जात. हिंदुस्थानाचा तत्सम आकडा ८९८ होता. पेटंटांचे दर दहा लक्ष वस्तीशी प्रमाण काढलें तर स्वित्सरलंडमध्यें तें १,०१६, बेल्जममध्यें ८९२, ग्रेटब्रिटनमध्यें ४९३, अमेरिकेंत ३७४ व हिंदुस्थानांत फक्त २ पडतें ! १९४६ सालीं हिंदुस्थान सरकारकडे पेटंटसाठीं २,६१० अर्ज आले त्यांपैकीं फक्त २६६ हिंदी लोकांचे होते. बाकीचे २,३४४ अर्ज विदेशीयांचे होते.

**ॲडमिनिस्ट्रेटिव्ह इनक्वायरी कमेटी—**मुंबई सरकारच्या राज्यकारभारांत काटकसर सुचविण्यासाठीं नेमण्यांत आलेल्या कमिटीनें प्रश्नपत्रिका काढली आहे. तिचीं उत्तरें १ मे १९४७ पूर्वीं कमिटीकडे पोंचलीं पाहिजेत.

**हिंदु-राष्ट्र प्रकाशन लि., पुणें—**अग्रणी दैनिक विकत घेऊन हिंदु संघटण, हिंदु-राष्ट्र आणि हिंदुत्व ह्यांच्या तत्वांस अनुसरून वृत्तपत्रें चालविणें वगैरेसाठी वरील खासगी कंपनी स्थापन झाली आहे. तिचें भांडवल ५ लक्ष रु. आहे. मेसर्स भारत मंडळकडे मॅनेजिंग एजन्सी आहे. श्री. गुलाबचंद हिराचंद, श्री. नथूराम वि. गोडसे, श्री. ना. द. आपटे हे तिचे भागीदार आहेत. ह्या तिघांचे खेरीज श्री. शिवराम विष्णु मोडक व श्री. भालजी पेंढारकर हेहि हिंदु-राष्ट्र प्रकाशन लि. चे डायरेक्टर आहेत.

**इटालीमध्यें बनविलेलें ब्रिटिश कापड—**इटालीमध्यें बनविण्यांत येत असलेल्या कापडावर " ब्रिटिश बनावट " असा शिक्का मारण्यांत येत आहे. कित्येक ब्रिटिश व्यापारी अशा रीतीनें इटलीमधील गिरण्यांतून " ब्रिटिश " माल उत्पादन करीत आहेत. ब्रिटिश सरकारच्यां अनुमतीनेंच ही व्यवस्था करण्यांत आलेली आहे.

**ब्रम्हदेशाच्या नोटांचा बदला—**हिंदुस्थानच्या रिझर्व्ह बँकेनें एक पत्रक काढून ब्रम्हदेश सरकारच्या १ हजार व १० हजार रुपयांच्या नोटांचा बदला हिंदी नोटांत देण्यांत येतील असें जाहीर केलें आहे. हा बदला ३१ मार्च १९४७ पर्यंत होणार असून वरील नोटा चलनांतून काढून घेण्यामुळें अशी सोय करण्यांत आली आहे. अर्ज १९४६ मधील १६७ नंबरच्या हिंदी सरकारच्या नोटिसीप्रमाणें करावयाचे आहेत.

★ प्रगति हीच लोकप्रियता ! ★

१९४६ साल सर्व दृष्टींनीं खडतर असतांही अनेक अडचणींना तोंड देऊन

# वेस्टर्न इंडिया

नें

नवीन काम २ कोटींवर पूर्ण करून अभिमानास्पद प्रगती केली. निश्चित लोकप्रियतेची ही खूण आहे.

आपले विमे याच कंपनींत उतरा व स्वास्थ्य मिळवा. माहितीसाठीं लिहा अथवा भेटा.

एजन्सीसाठीं चौकशी करा.

कृ. य. जोशी, बी. ए., एफ. आय. ए.

मॅनेजर

वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.,

सातारा.

पुणें शाखा कचेरीः—कर्वे वाडा, लक्ष्मी पथ, बेलबाग.









# अर्थ

बुधवार, ता. १२ मार्च, १९४७


संस्थापक

प्रा. वा. गो. काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## मध्यवर्ती सरकारचें क्रांतिकारक बजेट

### नफ्यावरील कर

यंदांच्या मध्यवर्ती सरकारच्या बजेटांतील मुख्य आकडे व नवीन कर-योजना याबद्दल माहिती गेल्या एका लेखांत दिली होती. यंदाचें बजेट विचारांना चालना देणारें आहे, व त्यावर हरतऱ्हेचीं मतें व्यक्त केलीं जात आहेत. अंदाजपत्रकांतील नवीन करांची योजना ही हिंदी व्यापारी वर्गाच्या महत्त्वाचा टीकेचा विषय झाला आहे. विशेषतः एक लाखापेक्षां जास्त असणाऱ्या व्यापारी व औद्योगिक नफ्यावर बसविलेला २५ टक्के कर हा औद्योगिक प्रगतीला विघातक ठरेल, एवढेंच नव्हे तर औद्योगिक उत्पादन कमी होईल, भांडवल उद्योगधंद्यांत गुंतविलें जाणार नाहीं, बेकारी निर्माण होईल व आर्थिक अनवस्था ओढवेल इ. टीका जबाबदार व्यापारी संस्थांकडून व उद्योगपतींकडून व्यक्त केली जात आहे. ता. ३ रोजीं फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचें वार्षिक अधिवेशन दिल्ली येथें पं. नेहरू ह्यांच्या प्रास्ताविक भाषणानें सुरू झालें, त्यावेळीं फेडरेशनचे अध्यक्ष लाला गुरुशरणलाल ह्यांनीहि बजेटांतील कर-योजनेवर टीका केली. खुद्द मध्यवर्ती कायदेमंडळांत युरोपियन ग्रुपचे मि. ग्रिफिथ ह्यांनीं, व काँग्रेस पक्षाचे श्री.मनु सुभेदार ह्यांनीहि टीका केली.विशेषतः गेल्याच वर्षी युद्ध-कालीन जादा नफ्यावरील कर रद्द केला गेल्यामुळें, यंदाचा हा कर व्यापारी व कारखानदार वर्गाला जास्त जाचक वाटत असावा. आर्थिक कारणापेक्षां मानसिक कारणामुळें जास्त टीका केली जात असावी. कारखानदार व व्यापारी ह्यांनीं युद्धकाळांत भरमसाठ नफा मिळविला असल्यामुळें, त्यांच्या तेव्हांच्या नफ्यावर २५ टक्के कर बसविला जात आहे यांत वावगें कांहींच नाहीं. ह्या कारणामुळें उद्योगधंद्यांवर व सांप्रत आवश्यक असलेल्या हरतऱ्हेच्या उत्पादनावर एकदम उलट परिणाम होईल असें वाटत नाहीं. कारखानदार व व्यापारी ह्याशिवाय ह्या कराविरुद्ध कोणीहि तक्रार केलेली नाहीं. सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रो. वकील ह्यांनीं नवीन करयोजनेचें स्वागतच केलें आहे. असेंब्लीमध्यें दोन दिवस बजेटावर भाषणें होऊन,अर्थमंत्री मि.लियाकत अली खान व वहातुक मंत्री डॉ. मथाई ह्यांनीं ता. ४ रोजीं दिलेलीं उत्तरें मार्मिक आहेत. "ज्या नफ्यावरील कराविरुद्ध एवढा गहजब केला जात आहे, तो गेल्या वर्षीच्या नफ्यावर लादला जाणार आहे, ही योजना सध्यां एका वर्षापुरतीच आहे, तेव्हां कारखानदारांनीं एवढा विरोध करण्याचें कांहींच कारण नाहीं." टीकेचा ओघ लक्षांत घेतां असें सुचवावेसें वाटतें कीं धंद्यांत गुंतलेलें भांडवल, उत्पादनाचा सर्व योग्य खर्च, व मिळणारा निव्वळ नफा त्या तीनहि गोष्टी योग्य तऱ्हेनें विचारांत घेऊन नफ्यावरील कराची आकारणी केल्यास तक्रारीला जागा उरणार नाहीं. कारण असें कीं कांहीं धंदे असे असतात कीं भांडवल व उत्पादनाचा खर्च ह्या मानानें नफ्याचें प्रमाण फार मोठें असतें. अशा धंद्यांवर जास्त कर लादणें योग्य होईल; परंतु ज्या धंद्यांत भांडवल व उत्पादनाचा खर्च ह्या मानानें नफा बराच कमी होत असेल अशांच्या बाबतींत कर-वसुली कमी प्रमाणांत केली जावी. दुसरी गोष्ट म्हणजे शक्य असेल तेथें कर चुकविण्यासाठी कारखाने देशी संस्थानांत नेले जातील, व नवीन कारखाने संस्थानी हद्दींतच निघतील. तिसरी गोष्ट म्हणजे आहे ह्या स्वरूपांत कर-योजना पास झाल्यास धंद्यांतील नफा एक लाख रुपयांचे आंतच राहील अशी तरतूद कारखानदार करतील. यामुळें शक्य तितकें कारखान्यांचें स्वरूप लहान ठेवलें जाईल. एकाच कारखान्याचे अलग भाग पाडले जातील, व धंद्यांना आवश्यक अश विकेंद्रीकरणावर भर दिला जाईल. पूर्ण विचाराअंतीं असें दिसतें कीं, त्या करा-विरुद्ध तक्रार बहुतेक निरर्थक आहे, एवढेंच नव्हे तर स्वार्थमूलक आहे. कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें ता. ५ रोजीं अर्थ-चिटणीस सर सिरिल जोन्स ह्यांनीं टीकाकारांना दिलेलें उत्तर मार्मिक आहे. त्यांच्या उत्तराचा आशय असा कीं, नवीन,कर-वाढी-विरुद्ध बुद्धिपुरस्सर गैरसमज पसरविला जात आहे व सर्वसाधारण लोकांची दिशाभूल करण्यांत येत आहे.

### बजेटांतील प्रशंसनीय गोष्टी

श्रीमंत व गरीब यांच्यांतील आर्थिक भेद शक्य तितके कमी करून, गरीबांचे जीवन जास्त कार्यक्षम करणें हें मुख्य ध्येय आहे. रिझर्व बँकेचे राष्ट्रीयीकरण केलें जाणार आहे. विशेषतः सरकारचा मुलकी खर्च फार वाढला आहे. तेव्हां त्यांत काटकसर सुचविण्यासाठी एक कमिटी नेमली जाणार आहे. युद्ध काळांत जे लोक कल्पनातीत श्रीमंत बनले आहेत, त्यांनीं पैसा कोणत्या मार्गांनीं मिळविला त्याची चौकशी केली जाणार आहे. शेअर्स, सोनें, कापूस इ० बाबतींत फार प्रमाणांत सट्टेबाजी चालल्यामुळें तिचे अर्थव्यवस्थेवर अनिष्ट परिणाम होतात. तेव्हां अशा सट्टेबाजीला आळा घालण्यांत येणार आहे. त्या सर्व गोष्टी प्रशंसनीय आहेत.

### कांहीं ठळक दोष

अंदाजपत्रकामध्यें सर्वसाधारण गरीब जनतेविषयीं जिव्हाळा दिसून येतो, व मिठावरील कर बंद करणें, प्राप्तीवरील कराला अडीचहजार रुपयांपासून सुरवात, व अन्न व कापड यांसाठी होणारा खर्च ह्या बाबी योग्यच आहेत. परंतु एकंदर उत्पादन वाढवून, जनतेचा राहाणीचा दर्जा सुधारण्याची कांहीं तरी निश्चित योजना बजेटामध्यें आवश्यक होती. दुसऱ्या शब्दांत म्हणजे सरकारनें बंद केलेलें युद्धोत्तर पुनर्घटना खातें पुन्हा सुरू करणें, व त्या खात्यामार्फत निश्चित औद्योगिक योजना आंखणें अत्यंत आवश्यक होतें. परंतु या बाबतींत बजेटनें पूर्ण निराशा केली आहे, एवढेंच नव्हें तर सांप्रतच्या नाजुक राजकीय परिस्थितींत अर्थ-मंत्र्यांनीं आपल्या भाषणांत, एके ठिकाणीं, अखिल भारतीय योजना आखणें कठीण असल्यामुळें प्रादेशिक किंवा प्रांतिक योजना आंखाव्या असें सुचविलें आहे तें योग्य नव्हे. वास्तविक हंगामी सरकारकडून भरभक्कम पायांवर आधारलेल्या औद्योगिक पुनर्घटनेच्या कार्यक्रमाची अपेक्षा जनता करीत होती. हिंदी जनतेच्या दारिद्र्याचा प्रश्न गरीब व मध्यम वर्गाला किरकोळ कर माफ

करून, किंवा केवळ श्रीमंतांवर जास्त कर लादून सुटणारा नव्हे. तर ह्या प्रश्नाची गुरुकिल्ली म्हणजे हरतऱ्हेचें उत्पादन शक्य तितकें वाढवून संपत्तीच्या विभागणीची पद्धति सुधारणें ही होय. इंग्लंडनें ज्याप्रमाणें निर्गतीची मोहिम सुरू केली आहे, त्याप्रमाणें हिंदुस्याननें त्वरित उत्पादनाची मोहीम सुरू केलीच पाहिजे; तरच आपला टिकाव लागेल. दुसरा ठळक दोष म्हणजे लष्करी खर्च भरमसाठ वाढला आहे व तो सरकारच्या आटोक्यांत राहिलेला नाहीं. तिसरी गोष्ट म्हणजे पे कमिशनचा शिफारशीमुळें पगारवाढ करावी लागून खर्च वाढेल, परंतु ह्याची तरतूद अंदाज पत्रकांत केलेली नाहीं. हिंदुस्थानचा परराष्ट्रीय व्यापार व रिझर्व्ह बँकेचें कार्य याबद्दलहि बजेटावरील भाषणांत कांहीं माहिती देणें आवश्यक होतें. आणखी एक गोष्ट म्हणजे लोकांना जबाबदार असणाऱ्या मध्यवर्ती सरकारकडून जनरल बजेट व रेल्वे बजेट यांच्या योजनेंत कांहीं तरी धोरणाचा एकसूत्रीपणा राखणें अत्यंत आवश्यक होतें, परंतु तसें कांहीं दिसत नाहीं, एवढेंच नव्हें तर रेल्वे बजेट जुन्या नोकरशाहीच्या परंपरेला साजेल असें आखलें गेलें आहे. असे दोष असले तरी यंदाचें बजेट नवीन मनूचें द्योतक आहे. त्यांतील पुष्कळशा योजना उत्तम आहेत व वर उल्लेखिलेल्या सुधारणा केल्यास पुढच्या वर्षीचें बजेट नमुनेदार ठरेल.

## स्फुट विचार

### १. मुंबई प्रांताची अन्नधान्य परिस्थिति

मुंबई सरकारनें प्रांतांतील अन्नधान्याच्या सांठ्याविषयी आणि कापडाच्या टंचाईविषयी काढलेल्या पत्रकामुळें प्रांतांत सर्वत्र काळजीचें वातावरण निर्माण झाल्याशिवाय रहाणार नाहीं. दर आठवड्याला दरमाणशीं देण्यांत येणाऱ्या शिध्याचें सध्याचें प्रमाण चालू होऊन एक वर्षापेक्षा अधिक काळ लोटला आहे. तरी सुद्धां त्यांत सुधारणा करून अधिक धान्य देतां येण्यासारखी परिस्थिति अद्याप सरकारला उत्पन्न करतां आलेली नाहीं. मुंबई प्रांत हा अन्नधान्याच्या दृष्टीनें तुटीचा आहे. या प्रांताला पंजाब, संयुक्त प्रांत, दिल्ली वगैरे सुपीक प्रांतांकडून निदान किमान गरजे इतकें अन्नधान्य मिळणें जरूर आहे. त्या प्रांतांची सरकारें आपआपल्या प्रांतांतून गरजेपेक्षां अधिक असणारें अन्नधान्य बाहेर पाठविण्यास नाखुष आहेत असें सरकारी पत्रकांत म्हटलें आहे पण आतां जनतेचें मध्यवर्ती सरकार अस्तित्वांत आलें असल्यामुळें अशा प्रकारच्या अन्याय्य नाखुषीला मान तुकविणें केव्हांहि इष्ट ठरणार नाहीं. मुंबई सरकारजवळ अन्नधान्याचा सांठा फक्त कांहीं आठवडे पुरेल इतकाच आहे. फेब्रुवारी आणि मार्च या महिन्यांत परदेशाहून आलेल्या गव्हापैकीं फक्त १९ हजार टनच गहूं मुंबई प्रांताच्या वांट्याला येणार आहे. अशा परिस्थितींत मुंबई सरकारनें आपल्या प्रांतांत उत्पन्न होणाऱ्या कापडाच्या उत्पादनाचा आधार घेऊन इतर प्रांतांवर दडपण आणलें तर तें अन्याय्य होणार नाहीं. हिंदुस्थानांतील सर्वच प्रांतांनीं एकमेकाशी सहकार्य करून प्रांतांचे संसार सुरळीतपणें चालविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मुंबई प्रांताचे मुख्य प्रधान आणि पुरवठा मंत्री ता. ८ रोजीं या प्रश्नासंबंधीं चर्चा करण्यासाठीं दिल्लीला गेले आहेत. त्यांनीं मध्यवर्ती सरकारला सर्व परिस्थिति समजाऊन देऊन तांतडीच्या उपायांची निकड लावणें जरूर आहे. नाहीं तर प्रांतांत अनवस्था प्रसंग लवकरच ओढवल्याशिवाय रहाणार नाहीं.

### हिंदी बँकिंगचें क्षेत्रांत लहानें बँकांचें स्थान

लहान लहान अशा पुष्कळशा स्वतंत्र बँकांपेक्षा, सर्व ठिकाणीं शाखा असलेल्या थोड्याशाच परंतु मोठ्या बँका श्रेयस्कर, असें कित्येकांना वाटतें आणि त्यास दाखला म्हणून ग्रेट ब्रिटनमधील 'बिग फाइव्ह' ह्या बड्या पांच प्रस्थांचा दाखला देण्यांत येतो. परंतु, हिंदुस्थानांतील विशिष्ट परिस्थितींत आणि दरिद्रीपणांत लहान बँकांचें महत्त्व निर्विवाद आहे. देवकरण नानजी बँकिंग कंपनीचे चेअरमन शेठ प्राणलाल देवकरण नानजी ह्यांनीं मुंबई येथें प्रोग्रेसिव्ह ग्रुपच्या सभेंतील आपल्या भाषणांत हा मुद्दा मांडला. आपल्या इकडील लोकांचें, बँकरशीं व्यक्तिगत संबंध आल्याविना समाधान होत नाहीं आणि लहान बँकांतच ही गोष्ट शक्य आहे. अमेरिकेंत अब्ज आणि ग्रेटब्रिटनमध्यें कोटि ह्यांचे आकड्यांत लोक विचार करीत असले, तरी कित्येक हिंदी लोकांना हजाराच्या आकड्यांपलीकडे जाण्याचें अद्याप कारण पडूं लागलेलें नाहीं. शहरी लोकांना लहान वाटणारी रकम खेडेगांवांत मोठीच वाटते. अशा परिस्थितींत योग्य एवढ्या आकाराच्या बँकांची वाढ होणें केव्हांहि इष्टच ठरेल. अर्थात, अशा बँका देशांतील सर्व बँकांच्या संघटनेंत सामील व्हाव्यात आणि त्यांच्या व्यवहारांत एकसूत्रीपणा असावा, हे केव्हांहि योग्यच आहे. सुरक्षितपणा, सचोटी, कार्यक्षमता आणि गिऱ्हाइकांच्या सोयीकडे लक्ष, ह्या गुणसमुच्चयाची बँकांच्या प्रगतीस अत्यंत आवश्यकता आहे, ह्याहि गोष्टीचा शेठ प्राणलाल ह्यांनीं आपल्या भाषणांत उल्लेख केला.

### वेस्टर्न इंडियाचे श्री. कृ. य. जोशी ह्यांचें अभिनंदन

वेस्टर्न इंडिया विमा कंपनी लि. चे मॅनेजर श्री. कृष्णाजी यशवंत जोशी, बी. ए., ए. आय. ए., हे इन्स्टिट्यूट ऑफ ॲक्चुअरीज ( लंडन ) ह्या संस्थेची फेलोशिपची विमाशास्त्रांतील अत्युच्च परीक्षा उत्तीर्ण झाले, ह्याबद्दल आम्हीं त्यांचें अभिनंदन करतों. १९२१ सालीं बी. ए. झाल्यानंतर त्यांनीं कै. ग. स. मराठे, ॲक्चुअरी, ह्यांच्या मार्गदर्शनाखालीं विमा शास्त्राच्या अभ्यासास प्रारंभ केला व १९२६ मध्यें ते ए. आय. ए. झाले. १९२९ व १९३० सालीं त्यांनीं अजमीरच्या जनरल ॲशुअरन्स कंपनींत व लाहोरच्या भारत इन्शुअरन्स कंपनींत ॲक्चुअरीच्या जागेवर काम केलें. १९३२ सालापासून ते वेस्टर्न इंडियाचे मॅनेजर म्हणून जबाबदारीनें व कुशलतेनें काम करीत आहेत. विमामहर्षि श्री. वा. ग. चिरमुले ह्यांनीं कंपनीचीं सूत्रें श्री. जोशी ह्यांच्या हातीं निःशंकपणें दिलीं व त्यांच्या कारकीर्दीत कंपनीचा उत्कर्ष चांगल्या प्रकारें झाला आहे, ह्यावरून श्री. चिरमुले ह्यांची निवड कशी हितकारक ठरली, हें दिसून येईल. विमा कंपनी चालविण्यास तज्ज्ञांची आवश्यकता नाहीं; यशस्वी एजंटहि लायक चालक होऊं शकतो, ही कल्पना आतां कोणासहि पटण्याजोगी नाहीं. वेस्टर्न इंडियासारख्या मोठ्या कंपनीचा कारभार विमाशास्त्रांतील अत्युच्च पदवी मिळविलेल्या एका अनुभवी आणि निष्ठावंत मॅनेजरचे हातीं असणें ही गोष्ट कंपनीस अत्यंत भूषणावह आहे. श्री. जोशी ह्यांनीं स्वतःच्या आयुष्यक्रमांत उत्कृष्ट व्यावसायिक यश मिळविलें आहे, इतकेंच नव्हें तर आपल्या कंपनीचा त्यांनीं स्वतःच्या यशानें दर्जा आणखी वाढविण्यास सहाय केलें आहे. ह्यासाठीं, कंपनीचें व तिच्या चालकांचेंहि अभिनंदन केलें पाहिजे.

**कराची–बलुचिस्थान रस्ता**—नॉर्थवेस्टर्न रेल्वेच्या सहकार्यानें कराची ते बलुचिस्थान रेल्वे रस्ता करण्याच्या प्राथमिक कार्याला लष्करी स्थापत्य शास्त्राच्या खात्याकडून प्रारंभ झाला आहे. याशिवाय कराची क्वेट्टा रेल्वे रस्त्यासंबंधींहि प्राथमिक पाहाणी चालूं आहे.

## पडत्या पाण्याच्या शक्तीचें विजेंत रूपांतर

### वेगवेगळ्या प्रांतांतील योजनांचा परामर्श

. (२)

#### पंजाब

पंजाबांतील पहिलें वीजकेंद्र मंडी संस्थानांत जोगेंद्रनगर येथें आहे. तेथें १२,००० किलोवॅट उत्पादक शक्तीचे ४ संच बसविले आहेत. १९३२ सालीं या वीजकेंद्राची बरीच सुधारणा करण्यांत आली. तेथून धारीवाल, अमृतसर, लाहोर, लियालपूर, फेरोजपूर, व जालंदर या शहरांना वीजपुरवठा केला जातो. कालवे व वीज यांच्या अधिक सोयीसाठी पंजाब सरकारनें पंचवार्षिक योजना आंखली असून बखरा, रसूल, मंगला व मियानवाली नामाभिधानांच्या योजना आंखल्या आहेत. बखरा योजनेप्रमाणें सतलज नदीला एका दरींत ४८० फूट उंचीचा बंधारा घालण्यांत येणार आहे. त्यापासून ४५ लक्ष एकर जमिनीला पाणीपुरवठा होईल व सुमारें २०० मैल लांबीचे पाटबंधारे बांधण्यांत येतील आणि सुमारें ४ लक्ष किलोवॅट वीजशक्ति निर्माण करतां येईल. रसूल योजनेचा उपयोग पाणी उपसून काढण्याकडे होणार आहे. पंजाबांतील कांहीं कालव्यांमुळें कांहीं भागीं पाणथळ प्रदेश निर्माण झाले आहेत. त्या भागांत विहिरी खोदून त्यांतील पाणी पंपांनीं कालव्यांमध्यें उपसून घ्यावयाचें व तें लागवडीस योग्य करावयाचे यासाठीं लागणारी वीजशक्ती रसूल योजनेनें पुरविण्यांत येणार आहे. मंगला योजनेचें वीजकेंद्र झेलम नदीच्या कालव्यावर व मियानवाली केंद्र थळ कालव्यावर उभारलें जाणार आहे.

#### वायव्य सरहद्द प्रांत

वायव्य सरहद्द प्रांतांतील वीजकेंद्र मालकंद घाटांत आहे. त्यापासून पेशावर, नवशेरा वगैरे शहरांकडे वीजपुरवठा केला जातो.

#### काश्मीर

काश्मिरांत गेल्या ४० वर्षांपासून वीज उत्पादन केली जाते. १९०७ सालीं झेलम नदीवर मोहारो येथें वीजकेंद्र बांधलें गेलें आहे. त्याशिवाय जम्मूलाहि एक छोटें वीजकेंद्र आहे. याशिवाय सिंधु नदीचें पाणी निराळ्या प्रवाहानें ८ मैल दूर नेऊन त्याचे सहाय्यानें वीज उत्पादनाची नवी योजना आहे.

#### राजपुताना

राजपुतान्यांत कोटा संस्थानांत सुमारें एक लाख किलोवॅट उत्पादनाचें वीजकेंद्र तयार होऊं शकेल.

#### मुंबई

मुंबई प्रांतांतील टाटा कंपनीचीं तीन वीजकेंद्रें खोपोली, भिवपुरी व भिरा हीं प्रसिद्धच आहेत. १९१५ सालापासून या केंद्रांतून मुंबईस वीज पुरविली जाते. या तीनहि केंद्रांची शक्ती पुष्कळ आहे व पुष्कळ वाढवितांहि येण्यासारखी आहे. नवी योजना कोयना नदीवरील असून त्याशिवाय मुंबई सरकारनें टाटा कंपनीच्या कक्षेबाहेरील प्रदेशाला वीजपुरवठ्यासाठी पुढील योजना आंखली आहे. डिझेल इंजिनवर चालणारे संच जागोजाग बसवावयाचे; अहमदाबाद, बडोदा व सुरत येथील वाफेवरील वीजकेंद्रें एकमेकांस जोडावयाचीं; नाशिक जिल्ह्यांतील भंडारदरा धरणासालीं दोन संच बसवावयाचे; आणि भाडघर येथील वीजकेंद्राची उत्पादनशक्ती दुपटीनें वाढवावयाची.

#### कोल्हापूर

कोल्हापूर संस्थानांत औद्योगिक व शेतीच्या प्रगतीसाठी राधानगरी येथें वीजकेंद्र उभारलेलें असून त्याचा विस्तार करण्यासाठीं नवी यंत्रसामुग्री मागविण्यांत आली आहे.

#### मद्रास

मद्रास इलाख्यांत १९३२ सालीं निलगीरी पर्वतांतील पाणलोटावर पायकारा योजना उभारण्यांत आली आहे. त्यासाठी २६० लक्ष घनफूट पाण्याचा एक व ५८० लक्ष घनफूट पाण्याचा दुसरा असे दोन खजिने १९३३ त बांधले गेले आणि त्यावर तीन ६ हजार किलोवॅट शक्तीचे संच बसविण्यांत आले आहेत. १९३८ सालीं मुकुर्ती धरणाची जोड देऊन आणखी दोन १० हजार किलोवॅटचीं यंत्रें बसविण्यांत आलीं. दुसरे मद्रासमधील वीजकेंद्र कावेरी नदीच्या मेतुर धरणावर आहे. हें धरण १७५ फूट उंच व ५३०० फूट लांब आहे; व त्यांत ९३५० कोटि घनफूट पाणी सांठते. हें धरण मुळत: शेतीसाठी १९२६ सालीं बांधावयास सुरवात झाली व १९३४ सालीं पूर्ण झालें. त्यावर नंतर १० हजार किलोवॅटचे तीन संच बसविण्यांत आले आहेत. तिसरें वीजकेंद्र ताम्रपर्णी नदीवरील धरणावर तिनेवेल्ली जिल्ह्यांत असून त्यावर तीन ५८०० किलोवॅटचीं यंत्रें बसविलीं आहेत. पायकारा व मेतुर केंद्रें एकमेकांस जोडलेलीं असून त्यापासून कोइमतूर, एरोड, त्रिचनापल्ली व मदुरा यांना व पापनाशम या कावेरी नदीवरील तिसऱ्या केंद्रांतून तुतीकोरीन, राजपालयन वगैरे शहरांना वीजपुरवठा होतो. मद्रासमध्यें एक वाफकेंद्र आहे तें पायकारा-मेतूर केंद्रांना जोडून व त्याची शक्ती वाढवून कांजीवरम् व श्रृंगारपेठ या शहरांना वीज पाठविण्यांत येणार आहे. पायकारा केंद्रांतून सुटणाऱ्या पाण्यावरच मोयार केंद्र उभारण्यांत येणार आहे. मद्रास इलाख्याच्या उत्तर भागाला बेझवाडा व विजगापट्टम येथलि वाफकेंद्रांनीं वीजपुरवठा होतो. त्याशिवाय मद्रास व ओरीसा यांच्या सरहद्दीवरील मचकुंदा नदीवर, राजमहेंद्रीजवळ गोदावरी नदीवर व बुक्कसागरम् येथें तुंगभद्रेच्या कालव्यावर नवीन वीजकेंद्रें आंखण्यांत आलीं आहेत.

#### कोचीन

कोचीन संस्थानांत पोरिंगालकुट्टु या ठिकाणीं चलाकडी नदीवर धरण बांधून वीजकेंद्र उभाण्यांत येणार आहे.

#### त्रावणकोर

त्रावणकोर संस्थानांत सह्याद्रीचा सुमारें १६० मैलांचा विस्तार असून पश्चिम बाजूस किनाऱ्याची पट्टी आहे. यामुळें हा भाग वीजकेंद्रांना सोयीस्कर असून त्यांत सुमारें अकरा सोइस्कर जागा आढळून आल्या आहेत. पैकीं सध्यां मुन्नार नदीवर पल्लीवासल येथें वीजकेंद्रें उभारलेलें आहे. त्याच्या विस्ताराच्या योजनाहि आंखण्यांत आल्या असुन १९४८ पर्यंत त्या पूर्ण होतील.

#### ब्रम्हदेश

ब्रम्हदेशांत साल्वीन, नामतु, शिवेली व पानलॉंग नद्यांवर अनेक वीजकेंद्रें निघू शकतील. इरावती नदी खूप मोठी आहे व वरील सर्व नद्या तिलाच येऊन मिळतात. पण खुद्द इरावती तितकीशी सोयीस्कर नाहीं. शिवाय ब्रह्मदेशांत वीजशक्तीला मागणीहि अजून नाहीं. रंगूनला वीज व पाणीपुरवठा करण्यासाठी सुमारें १२० मैलांवर वीजकेंद्र बांधण्यास योग्य जागा आहे. (अपूर्ण)

## कंपनीच्या उद्दिष्टपत्रिकेंतील बदल

### हायकोर्टाची मान्यता


एम्पायर ऑफ इंडिया विमा कंपनीनें आपल्या उद्दिष्टपत्रिकेंत कांहीं बदल करण्याचा विशेष ठराव करून त्यास मुंबई हायकोर्टाची संमति मिळविण्यासाठी मुंबई हायकोर्टाकडे अर्ज केला होता. नुकताच त्या अर्जाचा निकाल न्यायमूर्ति तेंडोलकर ह्यांनीं दिला आहे. कंपनीच्या मूळ उद्देशांत फक्त आयुष्याचा विमा स्वीकारणें एवढाच उद्देश दिलेला होता. त्या खेरीज आणखी आगीच्या, दर्यावरील व वैमानिक अपघाताचा, वाहनाखालीं अपघातांत सांपडलेल्या त्रयस्थ इसमाचा, आणि मालकाचा वगैरे अनेक प्रकारांचा विमा स्वीकारण्याचा अधिकार नव्यानें कंपनीला घ्यावयाचा होता. त्याचप्रमाणें, यापूर्वी कंपनीला आपल्या व्यवहारास न लागणारा जो पैसा तिजोरींत शिलकींत असेल तो फक्त इंडियन ट्रस्ट ॲक्टमध्यें उल्लेखिलेल्या सरकारी कर्जरोख्यांत, अथवा ब्रिटिश हिंदुस्थानांतील कापड गिरण्यांच्या डिबेंचर्समध्यें किंवा स्थानिक बँकांच्या ठेवींमध्यें तेवढा गुंतविण्याचा अधिकार होता. त्या ऐवजीं कंपनीला योग्य वाटेल व कंपनी वेळोवेळीं ठरवील त्या कोणत्याहि रीतीनें शिल्की रकमा गुंतविण्याचे अधिकार कंपनी उद्देशांत दुसरा बद्ल करून घेणार होती. हायकोर्टानें या अर्जाचा विचार करतांना धंद्याच्या कक्षा वाढविण्याचे बाबतींतील पहिला बदल कंपनीच्या हिताचा आहे काय हें पाहिलें पाहिजे असें मत व्यक्त केलें असून सध्यां हिंदुस्थानांत आयुर्विम्याचें काम करणाऱ्या कंपन्या पुष्कळ असल्या तरी आग,अपघात वगैरे सर्वसामान्य विम्याचा धंदा करणाऱ्या कंपन्या कमी आहेत व आयुर्विम्याचें काम करणाऱ्या कंपनीस आपल्या चालू कचेरीखर्चांत फारशी वाढ न करता हा धंदा करतां येणें शक्य आहे असें ग्राह्य धरून हा बद्ल कंपनीच्या हिताचा होईल असें ठरविलें आहे व तो करण्यास परवानगी दिली आहे. मात्र हा बद्ल झाल्याचें स्पष्ट करण्यासाठीं कंपनीनें "एम्पायर ऑफ इंडिया लाइफ ॲन्ड जनरल इन्शुअरन्स कं. लि." या स्वरूपाचें नांव घ्यावें व आयुर्विम्याच्या कामाचें जें राखीव धन असेल तें सर्वसामान्य धंद्याच्या वाढीसाठी वापरूं नये असेंहि हायकोर्टानें आज्ञापिलें आहे. दुसरा बदल करण्यास हायकोर्टानें संमति दिली नाहीं. कंपनीच्या शिलका सुमारें सहा कोटींच्या वर आहेत. परंतु उद्दिष्टपत्रिकेच्या कक्षेबाहेरील ठिकाणीं अगाऊच कांहीं रकमा कंपनीनें गुंतविलेल्या होत्या, शिवाय अशाप्रकारें कंपनी चाहील त्या ठिकाणीं रकमा गुंतविण्याची सत्ता कंपनीस देऊं नये; सरकारमान्य व बिनधोक ठिकाणींच कंपनीचा पैसा गुंतविला जावा अशा स्वरूपाचा विरोधहि सुमारें शंभर भागीदार व विमेदार यांनीं या बद्लास केला होता. तो लक्षांत घेऊन व कंपनीची शिलका गुंतविण्याची सत्ता मर्यादित ठेवण्याच्या दृष्टीनें कोर्टानें दुसरा बद्ल करण्यास संमति देण्याचें नाकारलें.

---

### कामगारांच्या वेतनांत वाढ—परंतु सलोख्यानें

हिंदुस्थानांत सर्वत्र संपांचें वातावरण दिसून येत आहे आणि त्याचा परिणाम उत्पादनावर प्रतिकूल रीतीनें होतो हें स्पष्टच आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें १९४६ सालीं सुमारें ७ लक्ष, ८५ हजार कामगारांचें साप्ताहिक वेतन २.८३ लक्ष पौंडांनीं वाढलें; म्हणजे १९४५ अखेरीचें मानानें १९४६ अखेर कामगारांस ८% ज्यास्त वेतन मिळूं लागलें. कित्येक उद्योगधंद्यांतील कामाचे तास कमी करण्यांत आले, ह्याचा अर्थ दरताशी पडणारें वेतन अधिकच वाढलें असा होतो. ग्रेट ब्रिटनमध्यें झालेली कामगारांच्या वेतनांतील वाढ कारखानदारांचे संघ व कामगारांचे संघ ह्यांचेमधील करारान्वयेंच मुख्यतः झालेली आहे, ही गोष्ट महत्त्वाची आहे. तडजोड किंवा लवाद ह्यांचा अवलंब करून मिळविलेल्या वेतनांतील वाढीचें प्रमाण शंभरांत चार, इतकें सुद्धां पडलेलें नाहीं.


पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.


फोन नं. २२७३८




साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितीमुळें वाहतुक व पुरवठा याबाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादनशक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी




मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

## औद्योगिक पुढाऱ्यांचे बैठकींत नेहरूंचें भाषण

अखिल भारतीय व्यापारी व औद्योगिक संघटनेच्या वार्षिक अधिवेशनप्रसंगीं पं. जवाहरलाल नेहरू यांनी केलेलें भाषण, देशांतील सध्याच्या राजकीय व आर्थिक परिस्थितीच्या गुंतागुंतीवर प्रकाश टाकणारें झालें. मध्यवर्ती सरकारमधील एक मंत्री या नात्यानें अशा प्रसंगीं बोलणें अवघड असल्याचें खुद्द पंडितजींनींच कबूल केलेलें आहे. सद्यःपरिस्थितींतील गुंतागुंत समजण्यास दोन तीन प्रमुख प्रश्नांचा उल्लेख केला तरी पुरेसा होईल. मध्यवर्ती सरकारचे फडणीस हिंदुस्थानांतील प्रांतांत प्रांतानिहाय अर्थ योजना व्हावी या मताचे आहेत; तर उलट पंडितजी अर्थ नियोजन सर्व हिंदुस्थान डोळ्यासमोर ठेवूनच झालें पाहिजे या मताचे आहेत. देशांतील उद्योगधंद्यांना धक्का न लावतां शक्य तो आर्थिक कारभार हांकण्याचें सरकारचें धोरण आहे व राहील असें पंडितजी म्हणतात. उलट, फडणिसांनीं सादर केलेल्या अंदाजपत्रकावरून देशांतील धनिक-वर्गावर कर बसवून सरकारला लागणारा पैसा उभा केला पाहिजे असें त्यांचें मत असल्याचें दिसतें. पंडितजींची अर्थ-नियोजनाची कल्पना केवळ अर्थव्यवहारापुरतीच मर्यादित नाहीं. त्यांनीं म्हटल्याप्रमाणें योजना म्हटली कीं कोणचें ध्येय पुढें ठेवावयाचें याची स्पष्ट कल्पना योजकांच्या पुढें असली पाहिजे. त्याचप्रमाणें कोणत्या प्रकारचा समाज निर्माण करावयाचा त्याचीही रूपरेषा डोळ्यासमोर असली पाहिजे. पं. नेहरूंनी योजनेच्या उद्दिष्टासंबंधीं मांडलेले हे मुद्दे चिंतनीय असेच आहेत. पण ज्या औद्योगिक संघटनेपुढें ते बोलत होते त्यासंस्थेमधील पुढाऱ्यांची औद्योगिक नियोजनाची कल्पना वेगळी असल्याचा अनुभव व्यवहारांत पदोपदीं येतो. हिंदुस्थानच्या औद्योगिक प्रगतीच्या ध्येयाचा पंडितजींनी दिलेला गोषवारा उत्साहजनक आहे. औद्योगिक प्रगतींत प्रथम स्थान उद्योगधंद्यांना लागणाऱ्या शक्तीला—पॉवर रिसोर्सेसला—देण्यांत पंडितजींची दूर दृष्टि दिसून येते. त्याचप्रमाणें औद्योगिक प्रगतीच्या नादांत शेतीच्या सुधारणेविषयीं दुर्लक्ष होतां कामा नये हा त्यांनी दिलेला इषाराही महत्वाचा आहे. सारांश, भाषणाची एकंदर दिशा समाधानकारक असली तरी प्रचलित राजकीय व आर्थिक विरोधांमुळें उपाययोजनेच्या दृष्टीनें त्यांत अनिश्चितता दिसून येते असें म्हणणें भाग आहे.

---

## रिझर्व्ह बँक सरकारी मालकीची झाली तर ?

हिंदी रिझर्व्ह बँकेचें राष्ट्रीयीकरण करण्याचा आपला विचार फडणवीस मि. लियाकत अलीखान, ह्यांनीं जाहीर केला आहे. मध्यवर्ती सरकारच्या हुकुमावरून रिझर्व्ह बँकेचें लिक्विडेशन झाल्यास भागीदारांस काय मिळावें, ह्याची तरतूद रिझर्व्ह बँक कायद्याच्या ५७ व्या कलमांत केलेली आहे. बँकेचा रिझर्व्ह फंड आणि शिलकी जिंदगी ह्यांची वाटणी मध्यवर्ती सरकार आणि भागीदार ह्यांचेमध्यें ७५:२५ अशी करावी, असें तें कलम सांगतें. भागीदारानें त्याच्या शेअरची भरलेली रकम + रिझर्व्ह बँक कायदा अमलांत आल्यापासूनच्या प्रत्येक वर्षासाठीं १%, ह्यांची जेवढी बेरीज होईल त्यापेक्षा ज्यास्त रकम भागीदारांस मिळूं शकणार नाहीं. रिझर्व्ह बँकेच्या प्रत्येक भागाचे भरलेले १०० रुपये आणि कायदा अंमलांत आल्यास होणारा १३ वर्षांचा काळ लक्षांत घेतला तर प्रत्येक भागीदारास त्याच्या प्रत्येक भागाचे ११३ रुपये मिळतील असा हिशेब होतो. २८ फेब्रुवारी रोजीं बँकेच्या शेअरचा बाजारभाव १३२ रु होता.


"Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India Rule 94-A by an order of which a complete copy is open to public inspection at the Head Office of the Company. It must be distinctly understood that in giving this consent the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them."

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि०

—पुणें—

**विक्रीस काढलेलें नवीन भांडवल रु. ७,००,०००**

प्रत्येकीं रु. ५० च्या १४,००० भागांत विभागलेलें.

★ वरील भाग ता. १४ फेब्रुवारी १९४७ रोजीं बँकेच्या पटावर असलेल्या भागीदारांना त्यांच्या प्रत्येक जुन्या २५ भागांना ७ नवीन भाग या प्रमाणांत प्रत्येकीं रुपये ५ वाढीनें देऊं केले आहेत.

★ भागीदारांनीं घेऊन शिल्लक राहिलेले भाग अितरांना तेवढयाच वाढीनें ( रु. ५ ) देण्यांत येतील.

★ अर्ज बँकेच्या मुख्य कचेरींत पोहोचण्याची शेवटची ता. १५ मे १९४७ ही आहे.

★ बँकेच्या शाखांत अर्ज ता. १०-५-१९४७ पर्यंतच स्वीकारले जातील.

★ अर्जाबरोबर पाठविणेची रक्कम रुपये ३० प्रत्येक भागाकरितां ( रुपये २५ भांडवलापैकीं + रु. ५ वाढीचे )

—संचालक मंडळ—

श्री. धों. कृ. साठे, अध्यक्ष.

| | |
|---|---|
| श्री. वा. पु. वर्दे | श्री. न. ग. पवार |
| श्री. श्री. गो. मराठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. फ. दो. पदमजी | श्री. मा. वि. शहा |
| श्री. शं. ल. किर्लोस्कर | श्री. भा. म. गुप्ते |

सी. व्ही. जोग,

मॅनेजर.

## ग्रामोद्योग संवर्धक मंडळ लिमिटेड

**लिंब. जि. सातारा.**

मंडळाचे व्यवस्थेखाली लोकसेवा वीव्हिंग मिल्स व लिंब-सातारा मोटार सर्व्हिस हे दोन उद्योग चालू आहेत. जुलै १९४६ अखेरचे अहवालाचें साल हें " लोकसेवा मिल " ला सध्यांचे कापड टंचाईचे काळांत जेवढें फायदेशीर व्हावयास पाहिजे होतें तेवढें होऊं शकलें नाहीं. ' मिल ' नें ठरविलेल्या कापडाच्या जातींस योग्य असें ठराविक नंबरचें सूत मिळणें शक्य झालें नाहीं. त्यामुळें ज्या नंबरचे सूत मिळेल ते सूत घेऊन त्याप्रमाणें मालाच्या निरनिराळ्या तऱ्हा काढाव्या लागल्या. धंद्याच्या दृष्टीनें पुष्कळशा जाती काढणें हें लहान कारखान्याला परवडत नाहीं. एकदां मिळालेलें सूत पुढील महिन्यास मिळेलच अशी खात्री नसलेनें एकूण कापडाच्या तऱ्हा बेसुमार वाढल्या. मिलला एकंदर २५ प्रकारच्या नंबरांचें सूत घ्यावें लागलें व त्याला अनुसरून २५।३० जातींचें कापड काढावें लागलें. माल विक्रींतील अडचणींचाहि धंद्यावर प्रतिकूल परिणाम झाला. अहवालाचे सालीं कापडाचें उत्पादन १,२३,६५२ वारांचें झालें. विक्री जवळ जवळ ८७,००० रुपयांची झाली. झालेल्या व्यवहारांत भागीदारांना ९ टक्के डिव्हिडण्ड व ३ टक्के बोनस, असे १२टक्के करमाफ द्यावयाचे आहेत. मोटारसर्व्हिस ही इतर ठिकाणच्या मोटार धंद्याप्रमाणें फायदेशीर नाहीं परंतु मिलच्या धंद्याला वहातुकीचे साधनाची अत्यंत आवश्यकता असल्यानें या गांवच्या नि आसपासच्या लोकांची सातारला जाणची सोय होते " लोकसेवा वीव्हिंग मिल्स" व "लिंब-सातारा मोटार सर्व्हिस" या दोन्ही धंद्यामुळें लिंबसारख्या खेडेगांवांत ५०।५१ लोक कामावर ठेवून पगार, गाडीभाडें व मजुरीच्या रूपानें जवळ जवळ १६ ते १७ हजार रुपये त्यांना देतां आले. मंडळाचें वसूल भांडवल ५,८०० रु. असून त्याचेकडे ६२ हजारांच्या मुदतीच्या ठेवी आहे. लिंबसारख्या एका बाजूच्या ठिकाणीं मॅनेजिंग डायरेक्टर श्री. त्रिं. मा. ठाकूर ह्यांनीं प्रतिकूल परिस्थितींतहि कसें चांगलें कार्य चिकाटीनें चालविलें आहे ह्याची कल्पना वरील वृत्तांतावरून येईल.

---

**नीपरवरील धरण**— रशियांतील नीपर नदीवरचें मोठें धरण जर्मन लष्करानें सुरुंग लावून उडवून दिलें होतें. धरणाच्या पुनर्रचनेचें काम आतां पूर्ण होत आलें असून कांहीं वीज केंद्रें नुकतीच सुरू करण्यांत आलीं आहेत. या केंद्रांतून आतां ७२ हजार किलोवॅट वीज निर्माण करण्यांत येत आहे.

**इंग्लंडचें इजिप्तला देणें:**— इंग्लंडला इजिप्तचें ४५ कोटी पौंडांचें देणें आहे. या देण्याबाबत या दोन देशांच्या प्रतिनिधींमध्यें चाललेलीं बोलणीं कोणत्याही प्रकारचें मतैक्य न होता फिसकटलीं आहेत. इराक आणि हिंदुस्थान यांच्या देण्याबाबत ज्याप्रमाणें प्राथमिक स्वरूपाचीं बोलणीं झालीं त्याच स्वरूपाच्या या वाटाघाटी होत्या.

**काळपुळीवर यशस्वी उपाय**—निना क्रुयेव्हा आणि जॉर्जी रॉकिन् या दोघा रशिअन शास्त्रज्ञ पति-पत्नींनीं काळपुळीवर एक लस शोधून काढली आहे. या लशीमुळें काळपुळीच्या गाठीचा नाश होतो; पण शरीरास कोणत्याहि प्रकारचा अपाय मात्र होत नाहीं.


लग्नसमारंभास व मेजवानींसाठी

—रूपॉक्सचा—

शुद्ध साखरेचा केशरयुक्त

**:: सुधारस ::**

**वापरा**

बाटली किंमत २-८-०

घाऊक माल घेतल्यास स्वस्त देऊं.

मागविण्याचा पत्ता:—फम्पायर एजन्सीज, ९५२, सदाशिव, लक्ष्मीरोड, पुणें २.



**दि रत्नाकर बँक लिमिटेड.**

ऑफिसें:—१ कोल्हापूर, २ शाहुपुरी, ३ सांगली, ४ मिरज, ५ जयसिंगपूर.

चेअरमनः—नामदार बी. बी. पाटील, बी. ए., एलएल. बी. डेव्हलपमेंट मिनिस्टर, सांगली स्टेट.

| | रु. |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | २०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ६,२७,१०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ३,१३,९०० |
| खेळतें भांडवल अंदाजें | ३५,००,००० |

—: अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात. :—



लोकांच्या विश्वासास पात्र झालेलें

**दी डेक्कन इंजिनिअरिंग, लिमिटेड.**

माधवनगर ( बुधगांव ) एम्. एस्. एम्. रेल्वे

| नांगर | —यांचे— | चरक |
|---|---|---|
| किसान नं. १०१ ( सहा ते आठ बैली ) | | विश्वास ( चार बैली ) |
| किसान नं. १०२ ( चार ते सहा बैली ) | | वासुदेव ( दोन बैली ) |
| किसान नं. १०५ ( दोन ते चार बैली ) | | राजा ( एक बैली ) |

' मधुकर ' ( सात फण्याचे ) कोळपें ( दोन बैली )

एजंटस्, स्टॉकिस्टस् नेमणें आहेत

### दि बँक ऑफ औंध लि., औंध
( वार्षिक सभा: १६-३-४७ )

वरील बँकेस ३०-१२-४६ अखेर संपलेल्या वर्षी २५,११२ रु. नफा झाला, तो काढण्यापूर्वी १६,४७० रु. वेगवेगळ्या फंडांत डायरेक्टर बोर्डानें टाकले आहेत आणि वाखविलेल्या नफ्यांतून १४, ३४० रु. रिझर्व्ह फंडांत टाकण्याची भागीदारांस शिफारस केली आहे. ४½% दरानें डिव्हिडंड देण्यास ६,४०६ रु. लागतील. अहवालाचे वर्षी शेअर भांडवलांत १२,२१० रु.ची वाढ झाली असून खेळतें भांडवल ४½ लाखांनीं वाढून २० लक्ष रुपयांपर्यंत आलें आहे. नोव्हेंबरमध्यें बँकेचें नवें ऑफिस सातारा येथें सुरू करण्यांत आलें आहे. बँकेस कमिशन व हुंडणावळ ह्याचें उत्पन्न चांगलें मिळत आहे. उत्पन्नाची ही बाब स्थिर व बिनधोक असते, आणि गिऱ्हाइकांस बँकेचा किती उपयोग होतो, ह्याचें ती एक चिन्ह असते. श्री. मा. रा. जोशी, पेपर मर्चंट, पुणें, हे बँकेचे चेअरमन असून श्री. बा. रा. वर्तक हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.


# NOTICE

**The Bharat Industrial Bank, Ltd., Poona**

Notice is hereby given that the 9th Ordinary General Meeting of the Shareholders of the Bharat Industrial Bank, Ltd., Poona will be held on Sunday 23rd March 1947 at the Registered Office of the Bank, 15, Shukrawar Peth, Poona at 5 p. m. to transact the following business.

1. To read and confirm the minutes of the Extra Ordinary General Meeting.

2. To receive and consider the Report of the Directors, Audited Balance sheet and Profit and Loss Account for the period ending 31st December 1946.

*3. To declare dividend on 6% C. R. P. Shares and on Ordinary Shares.

4. To elect Directors in places of the retiring Directors who are eligible for re-election.

5. To appoint Auditors and fix up their remuneration.

6. To transact such other business as may be allowed by the Chairman.

*Poona 5th March 1947*
*15, Shukrawar Peth, Poona 2.*

By order of the Board,
N. N. Kshirsagar,
R. B. Salvekar,
*Managiag Directors.*

*N. B.*—The Transfer Books of the Bank will be closed from 15th March to 30th March 1947 both days inclusive.

* The dividend when sanctioned will be payable on and after 15th April 1947. The dividend warrants will be posted to the registered addresses of the Share-holders.


**तुंगभद्रेवरील धरण**—मद्रासच्या पब्लिक वर्क्स खात्याच्या मंत्र्यांनी अशी माहिती सांगितली कीं तुंगभद्रेवरील धरण पूर्ण झाल्यावर बेल्लारी व कर्नोळ जिल्ह्यांतील तीन लाख एकर जमीन कालव्याच्या पाण्यानें भिजवितां येईल. या धरणाचें काम चालू झालें असून तें पुरें होण्यास सुमारें ८ वर्षे लागतील. एकंदर खर्च अंदाजे १० कोटी रुपये येईल.

**कामगारांना पांच महिन्यांचें बोनस**—कोइमतूर येथील गिरणी मालक आणि कामगार यांच्यांत तेढ उत्पन्न होऊन सुमारें ४२ हजार गिरणी कामगारांनीं गेल्या महिन्यांत १२ दिवसांचा संप केला होता. अखेर दोन्ही पक्षांनीं मद्रासचे मुख्य प्रधान श्री. टी. प्रकाशम् यांना लवाद म्हणून मान्य केलें. श्री. प्रकाशम् यांनीं कामगारांना ५ महिन्यांचा पगार बोनस म्हणून देण्यांत यावा असा निकाल दिला आहे.

**दि फ्लॅशलाइट पेंट्स लि.**—१० लक्ष अधिकृत भांडवलाची वरील कंपनी पुणें येथें नुकतीच स्थापन झाली आहे. ऑईल पेंटस, एनॅमल पेंटस, व्हार्निश, छपाईची शाई, इत्यादींचें ती उत्पादन करणार आहे. पुण्याजवळ कंपनीनें कारखान्यासाठी सात एकर जमीन मिळविली आहे. डायरेक्टर बोर्डाचें रावबहादुर शेंबेकर हे चेअरमन आहेत. श्री. एन. के. रानडे, एस. एल. आपटे, जी. एच. करमरकर इत्यादि मंडळीहि डायरेक्टर आहेत. डॉ. एन. एन. गोडबोले व डॉ. डी. आर. भवाळकर ह्यांचें तज्ज्ञ सल्लागार मंडळ कंपनीस लाभलें आहे.

**बॉबिन्ससाठी लाकूड**—मध्यप्रांत सरकारनें बॉबिन्स व कापड कारखान्यांना लागणाऱ्या इतर लाकडाचा पुरवठा करण्याचें १ एप्रिल १९४७ पासून बंद करण्याचें ठरविलें आहे. त्यानंतर जंगल कंत्राटदाराकडून अगर सरकारी लिलावांच्या द्वारांच लांकूड मिळूं शकेल.


# नोटीस

**भोर स्टेट बँक, लिमिटेड, भोर.**

नोटीस देण्यांत येते कीं, बँकेच्या भागीदारांची तिसरी साधारण सभा रविवार ता. ३० मार्च १९४७ इ. रोजीं दुपारीं ३ वाजतां बँकेचें रजिस्टर्ड ऑफिस, राजवाडा चौक, भोर ( भोर स्टेट ) या ठिकाणीं खालील कामासाठीं भरेल.

( १ ) बँकेचा ता. ३१ डिसेंबर १९४६ अखेरचा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक आणि संचालक मंडळ व हिशेब तपासनीस यांच्या अहवालांचा विचार करणें.

( २ ) डिव्हिडंड मंजूर करणें.

( ३ ) निवृत्त होणाऱ्या पण फेरनिवडणुकीस पात्र असलेल्या चार संचालकांचे जागीं संचालकांची निवडणूक करणें.

( ४ ) हिशेब तपासनीस नेमणें व त्यांचा मुशाहिरा ठरविणें.

( ५ ) अध्यक्षांचे परवानगीनें पुढें येणारीं इतर कामें.

संचालक मंडळाचे हुकुमावरून

पाली,
ता. ९ फेब्रुवारी १९४७.

श्री. वा. काळे,
व्यवस्थापक.

वि. सू.—बँकेच्या शेअर वर्गीकरण वह्या ता. १७ मार्च १९४७ ते ३१ मार्च १९४७ ( दोन्ही दिवस धरून ) बंद राहतील.

डिव्हिडंड देण्याचें मंजूर झाल्यानंतर तें मंगळवार ता. १ मे १९४७ पासून दिलें जाईल. डिव्हिडंड वॉरंट्स भागीदारांच्या नोंदलेल्या पत्त्यावर टपालानें पाठविलीं जातील. पत्ता बदलला असल्यास बँकेकडे सत्वर कळवावें.

( हें प्रॉस्पेक्टस नसून त्रोटक माहितीपत्रक आहे. संस्थेच्या इंग्रजी प्रॉस्पेक्टसची प्रत रजिस्ट्रार ऑफ कंपनीज, मुंबई ह्यांचेकडे नोंदविली आहे. )

# उद्यम एंजिनियरिंग लिमिटेड

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ५,००,००० रु. | विक्रीस काढलेलें भांडवल ३,००,००० रु. |
| २,००० 'अ' साधे भाग, प्रत्येकीं १०० रु. चे | १,२५० 'अ' साधे भाग, १,२५,००० रु. दर्शनी मूल्याचे |
| ४,००० 'ब' साधे भाग, प्रत्येकीं २५ रु. चे | ३,००० 'ब' साधे भाग, ७५,००० रु. दर्शनी मूल्याचे |
| २,००० ५% करमाफ रि. क्यु. प्रेफरन्स अग्राधिकार भाग, प्रत्येकीं १०० रु. चे | १,००० ५% अग्राधिकार भाग, १,००,००० रु. दर्शनी मूल्याचे |

## —संचालक मंडळ—

१. श्री. वामन चिंतामण काळे, बी. एस्सी., कुर्ला, ( अध्यक्ष ) धनी, स्टँडर्ड प्रॉडक्टस् मॅन्युफॅक्चरिंग कं. कुर्ला, भागीदार, काळेज् इंक मॅन्युफॅक्चरिंग कं. कुर्ला, संचालक, काळेज् सेल्स् असोसिएशन लि. मुंबई.

२. श्री. दामोदर मोरेश्वर साठे, जमीनदार व व्यापारी, पुणें. कार्यकारी संचालक, नवयुग चित्रपट लि., पुणें.

३. श्री. काशिनाथ महादेव महाजन, वकील व जमीनदार पुणें. संचालक, बृहन्महाराष्ट्र ट्रेडिंग कंपनी लि. पुणें., संचालक, पुना इन्व्हेस्टमेंट्स लि., पुणें.

४. श्री. श्रीनिवास चिंतामण काळे, बी. एस्सी., बी. ई. ( इलेक्ट्री. ), पुणें.

५. श्री. कृष्णाजी मोरेश्वर सहस्रबुद्धे, बी. ई. ( सिव्हिल ), एल. एस. जी. डी., पुणें. कन्सल्टिंग एंजिनियर आणि कॉन्ट्रॅक्टर. भागीदार, महाराष्ट्र कन्स्ट्रक्शन कंपनी पुणें. भागीदार, एअर लाइन रेडिओ आणि इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीज पुणें. भागीदार, महाराष्ट्र इंपोर्टर्स पुणें.

६. श्री. विष्णु गोविंद गांगल, जमीनदार आणि व्यापारी, कल्याण. संचालक, काळेज् सेल्स् असोसिएशन, लि. मुंबई. सभासद, सल्लागार मंडळ, प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक मुंबई शाखा, भागीदार, स्वदेशी स्टेशनरी मार्ट, मुंबई.

७. नागेश अनंत मेहेंदळे, ( पदसिद्ध ) जमीनदार आणि व्यापारी, माटुंगा. संचालक, काळेज् सेल्स् असोसिएशन मुंबई. भागीदार, स्वदेशी स्टेशनरी मार्ट मुंबई.

८. श्री. दत्तात्रय विनायक गोडसे, ( पदसिद्ध ) जमीनदार आणि कारखानदार, संस्थापक नि भागीदार, उद्यम मंडळ ( रजि. ) पुणें.

## —ब्रोकर्स—

१. बँक ऑफ महाराष्ट्र लि. पुणें, मुंबई आणि इतर शाखा.
२. प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें आणि मुंबई.
३. आर. आर. नावर आणि कं. फोर्ट, मुंबई.
४. भारत इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें आणि इतर शाखा.
५. दक्षिणी ब्राह्मण कोऑपरेटिव्ह बँक लि. दादर.
६. मराठी शेअर ब्रोकर्स, पुणें.

उद्देश:— कंपनीचे मेमोरँडम आणि आर्टिकल्स ऑफ असोसिएशनमध्यें दर्शविल्याप्रमाणें ही संस्था (कंपनी) स्थापन करण्यांत आली आहे. परंतु आरंभीं उद्यम मंडळ या नांवानें भागीदारींत चालू असलेल्या संस्थेचे सर्व व्यवहार विकत घेऊन ते पुढें चालविण्याचा उद्देश आहे.

विशेष:—( १ ) कंपनीचे मॅनेजिंग एजंटस् मेसर्स उद्यम मंडळ यांचे संस्थापक आणि भागीदार यांनीं अत्यंत परिश्रम घेऊन सुमारें सात वर्षांपूर्वीं अत्यंत लहान प्रमाणांत आरंभ करून कारखान्यास आतांचें विस्तृत स्वरूप दिलें आहे. सध्यां कारखान्यांत सुमारें ७५ ते ८० कामगार काम करीत असतात. असें असूनही गुडवईल म्हणून कांहींही रक्कम न घेण्याचें त्यांनीं ठरविलें आहे.

( २ ) तसेंच कारखान्यांत त्यांनीं वेळोवेळीं भांडवल रूपानें गुंतविलेल्या सर्व रकमेचे (ऑर्डिनरी) साधे भाग घेण्याचें त्यांनीं ठरविलें आहे.

( ३ ) त्याचप्रमाणें भागिदारांना निश्चित तीन टक्के तरी डिव्हिडंड दिल्याविना निव्वळ नफ्यावर कमिशन म्हणून कांहींही न घेण्याचें त्यांनीं योजिलें आहे.

( ४ ) काळेज सेल्स असोसिएशन यांचेसारखे अनुभवी आणि तज्ज्ञ विक्रेते कंपनीचे कांहीं मालास लाभले आहेत.

( ५ ) कंपनीचे कामकाजास आरंभ करण्यास कायद्याप्रमाणें लागणारी रक्कम बँकेंत जमा झालेली असून कंपनीचे व्यवहार सुरू करण्याचें प्रमाणपत्र ( Commencement Certificate ) दिनांक १३ फेब्रुवारी १९४७ ला मिळालें आहे.

मुख्य कार्यालय आणि कारखाना—२८२ शुक्रवार पेठ, पुणें २.

—कार्य प्रतिनिधी ( मॅनेजिंग एजंटस )—

उद्यम मंडळ ( रजिस्टर्ड ), २८२ शुक्रवार पुणें २

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३, शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.